# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संघटना-१५२२/प्र.क्र.३६/१६-अ दिनांक १३ मार्च, २०२३ अन्वये दिनांक १४ मार्च, २०२३ पासून राज्यव्यापी बेमुदत संप आंदोलनासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच, मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांनी संदर्भ क्र.संकीर्ण-२०२३/(२१०३/२३)/पुणे विभाग/७९०, दिनांक १६ मार्च, २०२३ अन्वये शासन परिपत्रकातील निर्देशानुसार खालील बाबी संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत कळविले आहे :-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९, मधील नियम क्रमांक ६ अनुसार शासनमान्य पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याने कोणत्याही संप/निदर्शनामध्ये सहभागी होऊ नये, असे स्पष्ट केले आहे.

२) शासकीय / अशासकीय महाविद्यालयातील कामकाज सुरळीतरित्या चालविण्यासाठी शासकीय / अशासकीय कर्मचाऱ्यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३) कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे **''काम नाही वेतन नाही''** हे धोरण राज्य शासन अनुसरत आहे.

४) विभागप्रमुख/कार्यालय प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडून जाऊ नये.

५) संपामध्ये सहभागी झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो.

६) संप संपेपर्यंत कुलसचिव / प्राचार्य यांनी कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये.

संपामध्ये विद्यापीठातील कोणतेही सेवक सहभागी नसल्याबाबतचा आजतागायतचा दैनंदिन अहवाल मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे कार्यालयास सादर करण्यात आलेला असून अशा प्रकारचा अहवाल पुढील आदेशापर्यंत दररोज सादर केला जाईल.

परिपत्रक क्र.८७/२०२१, जा.क्र.एएन/८४५, दिनांक १८ मार्च, २०२१, परिपत्रक क्र.८८/२०२१ जा.क्र.एएन/८६०, दिनांक १९ मार्च, २०२१ आणि परिपत्रक क्र.१००/२०२१, जा.क्र.एएन/१११५, दिनांक ०५ एप्रिल, २०२१ नुसार घोषित केलेल्या अत्यावश्यक सेवांना शासन परिपत्रक दिनांक १३ मार्च, २०२३ मधील मुद्दा क्र. ४ च्या तरतूदी लागू राहतील.

**सोबत :-**

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संघटना-१५२२/प्र.क्र.३६/१६-अ, दि.१३/०३/२०२३.
२. मा.सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे पत्र संदर्भ क्र.संकीर्ण-२०२३/(२१०३/२३)/पुणे विभाग/७९०, दि.१६/०३/२०२३.

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७ )
जावक क्र. एएन/965 )
दिनांक : 20 MAR 2023 )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

} यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

D:\Non-Teaching\2023\Circular\Circular Samp.docx

**दिनांक १४ मार्च, २०२३ पासून राज्यव्यापी "बेमुदत संप" आंदोलना संदर्भात करावयाची कार्यवाही....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५२२/प्र.क्र.३६/१६-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ मार्च, २०२३

**प रि प त्र क**

बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक १४ मार्च,२०२३ पासून राज्यव्यापी "बेमुदत संप" आंदोलन संदर्भाबाबत शासनास नोटीस दिली आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९, मधील नियम क्रमांक ६ अनुसार शासकीय कर्मचाऱ्याने कोणत्याही संप/निर्दशनामध्ये सहभागी होऊ नये असे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक २९ अन्वये बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना यांना मान्यता देण्यात आली आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र ही शासन मान्यता प्राप्त संघटना नाही. तथापि,राज्यव्यापी संपामध्ये राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांच्या दिनांक १४ मार्च, २०२३ पासूनच्या राज्यव्यापी बेमुदत संप आंदोलना दिवशी, शासकीय/ निमशासकीय कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग/ तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत :-

अ) शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व कर्मचारी यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत शासनाच्या प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) कर्मचाऱ्यांनी संपात सहभागी न होता, नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा.

क) संप काळात कार्यालय नियमित वेळेवर उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व ती व्यवस्था जबाबदार अधिकारी यांचेकडे दयावी. आवश्यकता भासल्यास गृहरक्षक/पोलिस दलाची मदत घ्यावी.

ड) विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडून जावू नये.

इ) विभागप्रमुखांनी /कार्यालय प्रमुखांनी या आदेशाच्या दिनांकापासून संप संपेपर्यत कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये आणि जे कर्मचारी रजेवर असतील

अशा प्रत्येक प्रकरणी विचार करुन त्यांची रजा रद्द करुन त्यांना कामावर तात्काळ बोलवावे किंवा कसे ते ठरवावे.

ई) शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे "काम नाही वेतन नाही" हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचा-यांना अवगत करावे.

फ) संपामध्ये सहभागी झाल्यामुळे त्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो याची सर्व संबंधितांना स्पष्ट सूचना देण्यात यावी.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये संप काळात अत्यावश्यक व इतर सेवा सुरळीत चालू राहतील याबाबत उपाययोजना कराव्यात.

५. सदर संप कालावधीमध्ये कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचारी यांची माहिती क्षेत्रिय कार्यालयांनी त्यांचेशी संबंधित मंत्रालयीन विभागांना कळवावी व मंत्रालयीन विभागाने त्यांच्या विभागाची माहिती दुपारी १२.०० वाजेपर्यत व अधिपत्याखालील कार्यालयांची संकलित माहिती दुपारी २.०० वाजेपर्यत या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,४ था मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे सादर करावी. तसेच ईमेल पत्ता **desk16a.gad-mh@gov.in** या ई-मेलवरही अचूक पाठवावी. यापूर्वी असे निदर्शनास आले आहे की, कर्मचारी यांच्या उपस्थितीची कार्यालयनिहाय माहिती विहित वेळेवर उपलब्ध करुन देत नाहीत. तेव्हा यावेळी काळजीपूर्वक सदर माहिती विहित कालमर्यादेत देण्याची व्यवस्था करावी.

६. सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात संपाच्या कालावधीत उपस्थितीची माहिती दुपारी ०१.०० वाजेपर्यत या विभागाकडे अचूक पाठवावी. तसेच संपाच्या कालावधीतील उपस्थितीची टक्केवारी दुपारी ०१.०० वाजेपर्यत या विभागाकडे अचूक प्राप्त होईल अशाप्रकारे पाठवावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०३१३१८२६३०१३०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

SURYAWANSHI SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=e2d0677dc3b9f523d6452edd479c3b2edc0887c9102b4130ae3ef3dd803b7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D73112565DB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2023.03.13 18:32:30 +05'30'

**(सं. द. सुर्यवंशी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई.
मा.सर्व सन्माननिय संसद/विधानपरिषद /विधानसभा सदस्य
मा.मुख्य सचिवांचे स्वीय सहायक

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद/ विधानसभा) विधानभवन, मुंबई.
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व उप विभागीय अधिकारी/सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
सह सचिव/उप सचिव (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय ,मुंबई.
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

## <u>प्रपत्र - अ</u>

मंत्रालयीन विभाग /प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांची संप कालावधीतील उपस्थितीबाबतची माहिती

दुपारी १२.०० वाजता/ दुपारी २.०० वाजता

**मंत्रालयीन विभाग-..................** दि. १३ मार्च, २०२३

गट -

| संवर्ग | एकूण कर्मचाऱ्यांची (संख्या) | | पूर्व परवानगीने रजेवर असलेले कर्मचारी (संख्या) | | संपात सहभागी झालेले कर्मचारी (संख्या) | | कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचारी (संख्या) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय |
| गट व संवर्ग निहाय | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

## प्रपत्र-ब

क्षेत्रिय अधिका-यांनी त्यांच्याशी संबंधित मंत्रालयीन विभागांना परस्पर पाठविण्याबाबतची माहिती

**क्षेत्रिय कार्यालयाचे नाव** ................. **जिल्हा-**..................

**त्यांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग-** ............. दि १३ मार्च, २०२३

**गट -**

| पद | एकूण कर्मचारी **(संख्या)** | पूर्व परवानगीने रजेवर असलेले कर्मचारी **(संख्या)** | संपात सहभागी झालेले कर्मचारी **(संख्या)** | कार्यालयात उपस्थित असलेले कर्मचारी **(संख्या)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| एकूण | | | | |

**प्रपत्र - क**

विभागीय आयुक्त कार्यालय तसेच त्यांच्या अधिपत्याखालील महसूली कर्मचाऱ्यांसह अन्य सर्व शासकीय कार्यालयातील जिल्ह्यांतील कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची माहिती.

**विभागीय आयुक्त-** दि. १३ मार्च, २०२३

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | एकूण कर्मचा-यांची (संख्या) | पूर्व परवानगीने रजेवर असलेले कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले कर्मचारी (संख्या) |
|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा | | | | |
| १. | खुद्द | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| **एकूण** | | | | | |

# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


क्रमांक- संकीर्ण -२०२३/(२१०३ /२३)/पुणे विभाग/ 790 दि. १६/३/२०२३

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
३. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे
४. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, पुणे
५. प्राचार्य / प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **दिनांक १४ मार्च, २०२३ पासूनच्या राज्यव्यापी बेमुदत संपाबाबत करावयाची कार्यवाही.**

संदर्भ - १. सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. संघटना १५२२/प्र.क्र.३६//१६-अ दि. १३.३.२०२३.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/२०२२-२३/संप /प्रशा-१/३५१७ दि. १६.३.२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, दिनांक १४ मार्च, २०२३ पासून शासकीय व निमशासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचा-यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी राज्यव्यापी बेमुदत संप पुकारलेला आहे याबाबत सोबतच्या शासन परिपत्रकातील निर्देशानुसार पुढील बाबी संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९, मधील नियम क्रमांक ६ अनुसार शासन मान्य पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-याने कोणत्याही संप / निदर्शनामध्ये सहभागी होऊ नये असे स्पष्ट केले आहे.
२. शासकीय / अशासकीय महाविद्यालयातील कामकाज सुरळीतरित्या चालविण्यासाठी शासकीय / अशासकीय कर्मचा-यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
३. कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे **"काम नाही वेतन नाही"** हे धोरण राज्यशासन अनुसरत आहे.
४. संपामध्ये सहभागी झाल्यामुळे कर्मचा-यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो.

सदर आदेशाच्या दिनांकापासून संप संपेपर्यंत कुलसचिव / प्राचार्य यांनी कोणत्याही कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये तसेच संपाबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये रोज **सकाळी ११.००** वाजेपर्यंत या कार्यालयास **jdhepune@gmail.com** या मेलवर न चुकता पाठविण्यात यावी.

**कर्मचा-यांची माहिती - (अशासकीय अनुदानित महाविद्यालये / अकृषि विद्यापीठे / अभिमत विद्यापीठे)**

| अ.क्र. | पदाचे नांव | एकूण कर्मचारी | पूर्व परवानगीने रजेवर असलेले कर्मचारी संख्या | संपात सहभागी झालेले कर्मचारी संख्या | महाविद्यालयात उपस्थित कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षकीय कर्मचारी | | | | |
| २ | शिक्षकेत्तर कर्मचारी गट- अ | | | | |
| २ | गट - ब | | | | |
| ३ | गट - क | | | | |
| ४ | गट - ड | | | | |

सोबत - संदर्भिय परिपत्रक.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

Circulars Desktop

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ८७/२०२१

**विषय : कोरोना विषाणू (COVID-19) प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना - विद्यापीठ कार्यालयातील शिक्षक/अधिकारी/सेवक यांच्या उपस्थितीवर मर्यादित कालावधीसाठी निर्बंध आणणेबाबत.**

**संदर्भ :** १. पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/साप्रवि/९१४४, दिनांक १६ मार्च, २०२१

२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.प्रशा/१/कावि/१९७/२०२१, दिनांक १६ मार्च, २०२१

३. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि-१/५२६९, दिनांक १६ मार्च, २०२१

४. Government of Maharashtra Department of Revenue and Forest, Distaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai Order No.DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 15 March, 2021

कृपया वरील संदर्भीय आदेश/पत्राचे अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त कार्यालयाने पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत कोव्हीड-१९ विषाणूचा प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार विद्यापीठाच्या शैक्षणिक/प्रशासकीय कार्यालयांबाबत दिनांक १९ मार्च, २०२१ पासून दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत खालील आदेश लागू करण्यात येत आहेत :

१. संविधानिक अधिकारी, शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुख/शाखाप्रमुख, तसेच गट-अ/गट-ब मधील सर्व अधिकारी तसेच गट-ड मधील सर्व सेवक रजेवर असल्याखेरीज नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहतील. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये वगळता इतर प्रत्येक प्रशासकीय/शैक्षणिक कार्यालयातील गट-क मधील शिक्षकेतर सेवकांपैकी ५०% प्रमाणे आळीपाळीने (Rotation) सेवकांना कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करुन घेण्यात यावे. अशाप्रकारे ज्या कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी घरी राहून (Work From Home) कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यात समावेश करु नये.

२. शैक्षणिक विभागातील शिक्षकांची एकूण संख्या अथवा १५ शिक्षक यापैकी जे कमी असेल एवढ्या शिक्षकांनी विभागामध्ये उपस्थित रहावे.

३. शैक्षणिक विभागातील संशोधकांना आवश्यकतेनुसार उपस्थित राहण्याची परवानगी विभागप्रमुखांनी द्यावी.

४. कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार तसेच आळीपाळीने सेवक कार्यालयात बोलवितांना शक्यतोवर सहमतीने निर्णय घ्यावा. तथापी या संदर्भात कार्यालय प्रमुखांचा निर्णय अंतिम राहील.

५. प्रतिबंधित क्षेत्रातील (Containment Zones) तसेच रजेवर (अर्जित/परिवर्तीत/अर्धपगारी/विनावेतन) असणारे सेवक वगळता इतर सेवक कोणत्याही कारणाने विभागात अनुपस्थित राहिल्यास त्यांची अनुपस्थिती अनुज्ञेय/विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात येईल. आळीपाळीने बोलवलेला सेवक परवानगी न घेता अनुपस्थित राहिल्यास त्याची त्या संपूर्ण आठवड्याची अनुपस्थिती गृहित धरुन अनुज्ञेय/विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात येईल.

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका.), दिनांक ११ जून, २०२० नुसार लॉकडाऊनच्या कालावधीत दिव्यांग अधिकारी/सेवकांना कार्यालयात उपस्थित राहण्याची सक्ती करु नये. अशाप्रकारे विभागात अनुपस्थित असणाऱ्या शिक्षक व अधिकारी/सेवकांचा अनुपस्थितीचा अहवाल प्रशासन शिक्षक/प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे सादर करावा.

७. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.४१/१८(र.वका.), दिनांक २३ जुलै, २०२० अन्वये गर्भवती महिला तसेच अवयव प्रत्यारोपण केलेले, केमो थेरपी, इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी घेत असलेले अधिकारी/सेवक हे कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळण्यास पात्र असतील. त्यासाठी त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८. सदर कालावधीत कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता वरिष्ठांनी कार्यालयात बोलविल्यास शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी. या कालावधीत शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी पूर्वपरवानगीशिवाय त्यांचे मुख्यालय सोडू नये.

९. प्रतिबंधित क्षेत्रात (Containment Zones) निवास असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कार्यालयीन कामकाजाकरिता बोलावू नये तसेच त्यांना घरी राहून (Work From Home) काम करण्याबाबत सूचना द्याव्यात. मात्र अशा सेवकांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रात माहिती भरुन शिक्षकांनी प्रशासन शिक्षक कक्षाकडे admint@unipune.ac.in या ई-मेल आयडीवर तसेच शिक्षकेतर सेवकांनी प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे adminnt@unipune.ac.in या ई-मेल आयडीवर दिनांक १९ मार्च, २०२१ पर्यंत कळवावे.

१०. संबंधित कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त कालावधीत आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलविण्यात आलेल्या शिक्षक/गट-क शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यादी दिनांक १९ मार्च, २०२१ पर्यंत प्रशासन शिक्षक/प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे सादर करावी.

कार्यालयाचे नाव :- एकूण कर्मचाऱ्यांची संख्या :-

| अ.क्र. | सेवक क्र. | शिक्षक/गट-क कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | उपस्थिती दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११. सुरक्षा विभाग, आरोग्य केंद्र, स्थावर विभाग व गृहव्यवस्थापन विभाग ही कार्यालये अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये असल्याने आवश्यकतेनुसार पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.

१२. सध्याची परीक्षा विषयक अत्यंत तातडीची कामे तसेच वित्त विभागातील आर्थिक वर्ष अखेरीची वित्त विषयक तातडीची कामे लक्षात घेता परीक्षा विभाग आणि वित्त व लेखा विभाग पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.

१३. सद्य परिस्थितीत संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने सदर कालावधीत बायोमॅट्रिक हजेरी प्रणालीच्या Face Recognition System चा वापर करावा तसेच आपल्या येण्याजाण्याच्या वेळेची नोंद ऑनलाईन तपासून सदर नोंदीबाबत काही त्रूटी असल्यास त्याबाबत त्वरीत प्रशासन शिक्षक/प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे कळवावे. सदर कालावधीतील अतिकालीक भत्ता लागू राहणार नाही.

१४. विद्यापीठाच्या सर्व प्रवेशव्दारातून केवळ विद्यापीठाचे अधिकारी/कर्मचारी/विद्यार्थी/विद्यार्थीनी/विद्यापीठातील रहिवासी यांना शक्यतोवर विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र पाहूनच प्रवेश दिला जाईल.

१५. सदर आदेश विद्यापीठ कार्यालयातील निम प्रशिक्षणार्थी, ईपीपी प्रशिक्षणार्थी, एकत्रित वेतनावरील सेवक इत्यादींना लागू राहणार नाहीत.

यासंदर्भात शासनाचे अथवा सक्षम प्राधिकरणाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास त्यासंदर्भात स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

संदर्भीय आदेशामधील नमूद मार्गदर्शक सूचनांचे तसेच दक्षतेच्या उपाययोजनांचे सर्व संबंधितांनी तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

वरील सूचनांच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था यांनी त्यांच्या महाविद्यालय/परिसंस्थेकरिता योग्य निर्देश त्यांच्या स्तरावर निर्गमित करावेत.

**सोबत :-**

१. पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/साप्रवि/९१४४, दिनांक १६ मार्च, २०२१
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.प्रशा/१/कावि/१९७/२०२१, दिनांक १६ मार्च, २०२१
३. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि-१/५२६९, दिनांक १६ मार्च, २०२१
४. Government of Maharashtra Department of Revenue and Forest, Distaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai Order No.DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 15 March, 2021
५. प्रतिबंधित क्षेत्रात रहिवास असल्याबाबतचे घोषणापत्राचा नमूना.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 845
दिनाकं : १८/०३/२०२१

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.८८ /२०२१

**विषय :** **कोरोना विषाणू (COVID-19) प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना - विद्यापीठ कार्यालयातील शिक्षक/अधिकारी/सेवक यांच्या उपस्थितीवर मर्यादित कालावधीसाठी निर्बंध आणणेबाबत.**
**संदर्भ :** परिपत्रक क्र.८७/२०२१, जा.क्र.एएन/८४५, दि.१८.०३.२०२१

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकामधील मुद्दा क्र.१३ खालील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे :-

सद्य परिस्थितीत संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने सदर कालावधीत बायोमॅट्रिक हजेरी प्रणालीच्या Face Recognition System चा वापर करावा तसेच आपल्या येण्याजाण्याच्या वेळेची नोंद ऑनलाईन तपासून सदर नोंदीबाबत काही त्रूटी असल्यास त्याबाबत त्वरीत प्रशासन शिक्षक/प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे कळवावे. सदर कालावधीतील अतिकालीक भत्ता लागू राहणार नाही. मात्र केवळ पुर्ण क्षमतेने कार्यरत राहणाऱ्या विभागांनाच (मुद्दा क्र.११ व १२ मध्ये नमूद केलेली) सदर कालावधीतील अतिकालीक भत्ता देय राहील.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ ८६०
दिनाकं : १९/०३/२०२१

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

} आपणास विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.१००/२०२१

**विषय : कोरोना विषाणू (COVID-19) प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना - विद्यापीठ कार्यालयातील शिक्षक/अधिकारी/सेवक यांच्या उपस्थितीवर मर्यादित कालावधीसाठी निर्बंध आणणेबाबत.**

**संदर्भ :** १. परिपत्रक क्र.८७/२०२१, जा.क्र.एएन/८४५, दिनांक १८ मार्च, २०२१
२. परिपत्रक क्र.८८/२०२१, जा.क्र.एएन/८६०, दिनांक १९ मार्च, २०२१
३. Government of Maharashtra Department of Revenue and Forest, Distaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai Order No.DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 4th April, 2021
४. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि-१/५७७३, दिनांक ०५ एप्रिल, २०२१

कृपया वरील संदर्भीय परिपत्रक व आदेश/पत्राचे अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ विषाणूचा प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत. विद्यापीठाच्या शैक्षणिक/प्रशासकीय कार्यालयांबाबत यापूर्वी उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार लागू करण्यात आलेल्या आदेशास दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच खालीलप्रमाणे नव्याने सुधारित आदेश दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत लागू करण्यात येत आहेत :-

१. विद्यापीठ कार्यालय बंद होण्याची वेळ सायंकाळी ६.०० ऐवजी सायंकाळी ५.०० वाजताची राहील.
२. महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी (दि.१०/०४/२०२१) आणि चौथ्या शनिवारी (दि.२४/०४/२०२१) घरी राहून (Work From Home) काम करावे.
३. विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजाची तातडीची निकड विचारात घेता प्रशासन शिक्षकेतर कक्ष आणि प्रशासन शिक्षक कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.
४. केवळ पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणाऱ्या विभागांनाच सदर कालावधीतील अतिकालीक भत्ता देय राहील.
५. कार्यालयीन कामासाठी शक्यतो बाहेरील व्यक्तींना प्रवेशास मनाई राहील.

यासंदर्भात शासनाचे अथवा सक्षम प्राधिकरणाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास त्यासंदर्भात स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

संदर्भीय आदेशामधील नमूद मार्गदर्शक सूचनांचे तसेच दक्षतेच्या उपाययोजनांचे सर्व संबंधितांनी तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

वरील सूचनांच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था यांनी त्यांच्या महाविद्यालय/परिसंस्थेकरिता योग्य निर्देश त्यांच्या स्तरावर निर्गमित करावेत.

**सोबत :-**

१. Government of Maharashtra Department of Revenue and Forest, Distaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai Order No.DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 4th April, 2021
२. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि-१/५७७३, दिनांक ०५ एप्रिल, २०२१

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/१११५
दिनांक : ०५/०४/२०२१

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

C:\Users\Dell\Documents\Non-Teaching\2021\Circular\Govt. Circular.docx